# पीक उत्पादनासाठी शिफारशीत खतमात्रा

डॉ. आदिनाथ ताकटे



तुरीच्या जोमदार वाढीसाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे.

## तूर

- लागवडीसाठी मध्यम ते भारी (४५ ते ६० सेंमी), पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. चोपण पाणथळ जमिनीत पीक चांगले येत नाही. कसदार, भुसभुशीत, पोयट्याच्या जमिनीत तूर चांगली येते. जमिनीत स्फुरद, कॅल्शिअम, गंधक या अन्नद्रव्यांची कमतरता नसावी. सेंद्रिय कर्बाची चांगली उपलब्धता असावी. प्रति हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे.
- माती परिक्षणानुसार प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद ही खतमात्रा द्यावी. किंवा १२५ किलो डीएपी पेरणीच्या वेळी द्यावे. पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी ३० किलो पालाश म्हणजेच ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश दिल्यास पिकामध्ये रोगप्रतिकारक्षमता वाढून उत्पादन वाढते.
- पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना १९:१९:१९ या खताची (१ ते २ टक्के) फवारणी करावी.
- पाणी देण्याची सोय नसेल तर फुलोरा अवस्थेत २ टक्के युरिया (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम) किंवा दाणे भरण्याच्या अवस्थेत २ टक्के पोटॅशियम नायट्रेटची (१३:०:४५) एक फवारणी करावी.

## सूर्यफूल

- मध्यम ते भारी खोलीची, चांगला निचरा होणारी, आम्लयुक्त आणि पाणथळ जमिनीत लागवड करू नये. जमिनीत हेक्टरी १० ते १२ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- बागायती पिकाला ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ६० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. उर्वरित ३० किलो नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. गंधकाची कमतरता असल्यास हेक्टरी २० किलो गंधक शेणखतात मिसळून द्यावे.

कोरडवाहू क्षेत्रातील पिकासाठी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद, २५ किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावा.

## तीळ

- लागवडीसाठी मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- पिकाला प्रति हेक्टरी २५ किलो नत्र पेरणीवेळी आणि पीक तीन आठवड्यांचे झाल्यावर २५ किलो नत्र द्यावे. जमिनीत गंधकाची कमतरता असल्यास पेरणीच्या वेळी २० किलो गंधक प्रति हेक्टरी द्यावे.

## बाजरी

- हलकी ते मध्यम, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. हलक्या जमिनीत सरी वरंबा पद्धत फायदेशीर ठरते. प्रति हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- हलक्या जमिनीत ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद, २० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. मध्यम जमिनीमध्ये ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद, २५ किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी, उर्वरित अर्धे नत्र (२५ किलो) पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे.

## खरीप ज्वारी

- मध्यम काळी, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे.
- प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश खतमात्रा द्यावी. अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी, उर्वरित अर्धे नत्र (५० किलो) पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे.

## मूग, उडीद

- मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. पाणी साचून राहणारी, क्षारपड, चोपण किंवा हलकी जमीन टाळावी. हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- माती परीक्षणानुसार प्रति हेक्टरी २० किलो नत्र, ४० किलो स्फुरद ही खतमात्रा द्यावी किंवा १०० किलो डीएपी पेरणीच्या वेळी किंवा ३० किलो युरिया आणि २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट प्रति हेक्टरी द्यावे. पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी ३० किलो पालाश (५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) दिल्यास पिकामध्ये रोगप्रतिकारक्षमता वाढून उत्पादन वाढते.
- १५ जुलैनंतर मूग व उडदाची पेरणी करू नये.

## कुळीथ, मटकी

- हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ चोपण, क्षारयुक्त जमिनीत लागवड टाळावी. प्रति हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- प्रति हेक्टरी १२.५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद खतमात्रा द्यावी किंवा ७५ किलो डीएपी पेरणीच्या वेळी द्यावे.

## चवळी

- हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ चोपण, क्षारयुक्त जमिनीत लागवड टाळावी. प्रति हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद खतमात्रा द्यावी किंवा १२५ किलो डीएपी पेरणीच्या वेळी द्यावे.

## राजमा

- हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ चोपण, क्षारयुक्त जमिनीत लागवड टाळावी. प्रति हेक्टरी ५ टन शेणखत, कंपोस्ट खत मिसळावे.
- पेरणी करताना प्रति हेक्टरी ३० किलो नत्र, ८० किलो स्फुरद खतमात्रा द्यावी किंवा १७० किलो डीएपी पेरणीच्या वेळी द्यावे. पीक २० दिवसाचे झाल्यावर प्रति हेक्टरी नत्राचा दुसरा हप्ता ३० किलो (प्रति ७० किलो युरिया) द्यावा.

- डॉ. आदिनाथ ताकटे, ९४०४०३२३८९,
(एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. नगर)

## छोट्या जाहिराती

व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड: सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

### बी - बियाणे

#### बियाणे / रोपे विक्री

**तुरीचे सर्वोत्कृष्ट वान** राहुरीचे संशोधन दुर्मिळ असलेले फुले तृप्ती, फुले राजेश्वरी व सोयाबीन अमेरिकन सुपर फुले दुर्वा ९९२ बियाणे मिळेल. मो.९५६१६२३४९८.

**विविध जातींचे हळद बियाणे** विक्रीस उपलब्ध फक्त सहा महिन्यात येणारी हळदीची जात 1) ACC 48 प्रगती स्पाइस बोर्डा कडून उत्पादित आणी प्रसारीत जात 2) वायगाव-केवळ सात महिन्यात येणारी हळद 3) चेन्नासेलम -ओल्या हळदीमध्ये उच्चउत्पादन क्षमता असणारी आचारसाठी सर्वोत्कृष्ट व्हरायटी ४) मेघा त्याची उच्च कर्क्युमिन% साठी जगप्रसिध्द असलेली व्हरायटी. LAKADONG.9503210270, 9561330128. amittraders6999@gmail.com

**महोगनी, मिलीयाडुबीया,** चंदन, रक्तचंदन, साग, बांबु, फळझाडे व वृक्षारोपणाकरीता लागणारी रोपे होलसेल व रिटेल उपलब्ध "ग्रीनगोल्ड" नर्सरी नागपूर ९३२६२५४२३४/८४१२९२०५८१

**काळी हळदीसह 344 प्रकारच्या** अति मौल्यवान दिव्य औषधी वनस्पतींची देशातील सर्वात मोठी रोपवाटीका.प्रचंड मागणी असलेले 100% औषधी गुणी मूल्यवाण. 30 वर्षे अनुभवी. 7709902754.

### जलसिंचन

#### बोअरवेल्स

**त्वरा करा!! त्वरा करा!! त्वरा करा!!** बोअरवेलचे पाणी वाढवणारे पेटंटेड तंत्रज्ञान फक्त ०८ हजार रुपयात. मराठवाड्यातील जिल्ह्यां साठी मर्यादित योजना. प्रथम नोंदणी करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात सेवा. संपर्क: 8956960567 / 8956960566.

#### पशुधन व्यवसाय

#### मत्स्यपालन

**मच्छीबीज मिळेल,** जाती राहु, कटला, सुपरनेस, चिलापी, मरळ, कोळंबी, इ. मस्येंद्रनाथ मत्स्य प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर 8888650918, 8087997100.

#### शेतीविषयक अन्य विषय

#### फळोत्पादन/ फळप्रक्रिया

**फळबागांची सर्व कामे** सघनआंबा केळी पपई डाळिंब लिंबू शेवगा पेरू अंजीर व कमी खर्चाचे जिवंत काटेरी कंपाऊंड, निरा लागवड मजुरासह करून देऊ. 9422732825.

### हरीतगृह

**वडाळा ता. उत्तर सोलापूर** येथे पॉलिहाऊस व 20 गुंठे शेड नेट भाड्याने देणे आहे. संपर्क : 9730394040.

#### वनीकरण / वृक्षारोपण

**वनीकरणासाठी लागणारी रोपे/** बियाणे मार्गदर्शन मोफत. महाराष्ट्र इतर राज्यात. ग्रामपंचायतीच्या गुण-वत्ता व अस्तित्व निर्माण करण्या बाबत, हरितमित्र परिवार. डॉ. महेंद्र घागरे : 9766000888.

#### व्यवसायविषयक

#### व्यवसाय धंदा

**करोडो रुपयांच्या उत्पन्नाची** 100% गॅरंटी! दिव्य औषधी वनस्पतींचे नवीन- गुप्त व्यवसाया मध्ये सुवर्णसंधी. देशात प्रचंड मागणी. 30 वर्षे अनुभवी. नोंदणी 20 जून पर्यंतच. 7709902754.

**वाचकांसाठी निवेदन**

सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या-नुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

-वरिष्ठ व्यवस्थापक, ॲग्रोवन

### जाहिरातीसाठी संपर्क

- पुणे - शितल - ९९७५७६५८३८
- सातारा - अजिंक्य - ८९५६१३२५९५
- सांगली - शितल - ९८८११२९२९३
- नाशिक - चेतन - ९१६८६६११५८
- छ. संभाजीनगर - दत्ता - ८६२४०२३२५६
- अहमदनगर - मारुती - ८३९०५६९५१३
- नागपूर - प्रशांत - ८८८८७१८६००
- अकोला - महेश - ९०११०६१९३३
- जळगाव - भूषण - ९९६०४११११६
- सोलापूर - रोहित - ९६५७३६०३४६

अग्रोवन, सकाळ मिडिया प्रा. लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११००२
फोन.०२०-२४४०५८४४-Email agrosakalevents@esakal.com